**F.Y.B.A. SEM – I (CBCS -2016 Course) : WINTER - 2018**
**SUBJECT: MARATHI (G1)-I**

Day : Tuesday
Date : 23/10/2018

**W-2018-0014**

Time : 11.00 A.M. TO 02.00 P.M.
Max. Marks: 60.

---

**सूचना:**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक गुणांचा निर्देश करतात.
३) मराठी भाषेच्या लेखननियमांनुसार लेखन करणे आवश्यक आहे.

---

**प्र.१ अ)** पुढीलपैकी योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा. (०६)

१) गणपा ------ च्या भूमिकेत फाकडू दिसायचा.
(अ) संभाजी (ब) शिवाजी (क) तानाजी (ड) येसाजी

२) कोल्हापूर जिल्ह्यातील ----- या गावी शिवाजी सावंतांचा जन्म झाला.
(अ) कागल (ब) आजरा (क) इचलकरंजी (ड) गगनबावडा

३) अमावस्येच्या मध्यरात्री नारायण पावण्याने ----- आंघोळ घातली.
(अ) पोपटाला (ब) घुबडाला (क) सशाला (ड) मोराला

४) आचार्य अत्रे दै.मराठाचे संपादक असताना रविवारच्या अंकात शिवाजी सावंत यांनी ----- चे व्यक्तिरेखांकन प्रकाशित केले होते.
(अ) तोतरा दत्तू (ब) टी.डी. (क) तातू (ड) खडकावरची म्हातारी

५) शिवाजी सावंतानी श्रीकृष्णाच्या जीवनावरती ---- कादंबरी लिहिली.
(अ) छावा (ब) लढत (क) मृत्यंजय (ड) युगंधर

६) चैत्र पाडव्याला आजऱ्यात ----- शर्यती व्हायच्या.
(अ) म्हैशींच्या (ब) बैलांच्या (क) घोड्यांच्या (ड) बकऱ्यांच्या

**ब)** पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (०६)

१) लोक धर्माचा धंदा करतात, पण खुदबुने धंद्याचा काय केला होता?
२) वाटाण्याच्या हंगामात तुकारामबापू कोणत्या टोळीचा बिनविरोध अध्यक्ष असायचा?
३) जयराम पुण्यातील कोणत्या मासिकाचा संपादक होता?
४) 'संतू' च्या हॉटेलचे नाव काय होते?
५) 'टी.डी.' लेखकाला कसा वाटायचा?
६) बालपणीच्या अबोध वयात लेखकाला कोणता बगलबाज खेळ विलक्षण आवडायचा?

**प्र.२** 'व्यक्तिचित्र' या साहित्यप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

'अशी मने असे नमुने' मधून शिवाजी सावंत यांच्या व्यक्तिमत्वाची कोणती वैशिष्ट्ये आढळतात, ते स्पष्ट करा.

**प्र.३** पुढीलपैकी कोणत्याही दोन विषयांवर विवेचक टीपा लिहा. (१२)

**क)** कांत्याचे फलचौर्यकर्म
**ख)** 'तातू' या व्यक्तिचित्राचे विशेष
**ग)** 'गणपा' ची शिवाजीची भूमिका

प्र.४ पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. (१२)

**क)** आईचे कुटुंबातील स्थान

**ख)** वाढती उत्सवप्रियता

प्र.५ **अ)** मुद्रितशोधन कसे करावे, ते लिहा. (०६)

**किंवा**

मुद्रितशोधन म्हणजे काय?

**आ)** मुद्रितशोधनाच्या योग्य त्या खुणा वापरून पुढील उतारा दुरुस्त करा. (०६)

मातचा महीमा मी किती सांगू प्रत्यक्ष परमेश्वराही तो नीठ सांगायेणार नाही. मातेचे सारे मुलासाठी. मुलांचे जरा काही दुखलेखुपले कि ती होते अस्वस्थ.

**किंवा**

पुढील गोष्टींसाठी मुद्रितशोधनाच्या योग्य त्या खुणा लिहा.

- काढून टाका
- मात्रा टाका
- स्वल्पविराम टाका
- काना द्या
- ऱ्हस्व उकार
- उद्गारचिन्ह

* * *